## नि.क्र.५६ वर आदेश
## (दि.१६.०१.२०२०)

वादीने सदरच्या दाव्यात दस्ताऐवज सादर करण्याकरीता परवानगी मागीतली आहे. वादीच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की, वादीला सदरच्या दाव्यात महत्वाचे दस्ताऐवज दाखल करायचे आहेत. पुढे त्यांनी अशी विनंती केली की, वादीचा अर्ज मंजूर करण्यात यावा.

२) प्रतिवादी क्रं.४ याच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की, वादीने सादर केलेले दस्ताऐवज हे त्याच्या ताब्यात असुन सुध्दा त्याने दाखल केले नाही. त्यामुळे त्याला सदरचे दस्ताऐवज हे यावेळी दाखल करता येत नाही. वरील कारणामुळे त्यांचा सदरच्या अर्जावर आक्षेप आहे.

३) सदरचा दावा हा पुराव्याकरिता प्रलंबित आहे. त्यामुळे वादीने सादर केलेले दस्ताऐवज हे अभिलेखावर घेतल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. कारण त्यांना सदरच्या दस्ताऐवजांवर उलटतपासणी घेण्याची संधी उपलब्ध आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

अर्ज मंजूर करण्यात येतो.

अहमदपूर.
दिनांक : १६.०१.२०२०

(अ.रा.सुर्वे)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
अहमदपूर.

Certified that PDF copy of Order supra is word-to-word identical to the original Order.

Name of Stenographer : A.S.Kodgire
Dictated on : 16.01.2020
Checked on : 16.01.2020
Signed on : 16.01.2020
Uploaded on : 16.01.2020